
ISSN - 2229 - 4929

# अक्षर वाङ्मय

४ मार्च २०२०




संपादक
डॉ. नानासाहेब सूर्यवंशी

आर.एन्.आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र.नं.- MAHMAR-36829-2010

ISSN : 2229-4929

# अक्षर वाङ्मय

**०४ मार्च २०२०**

: संपादक :

**डॉ. नानासाहेब सूर्यवंशी**

: कार्यकारी संपादक :

**डॉ. भास्कर ताम्हनकर**

: संपादक मंडळ :

**डॉ. शशिकांत श्रंगारे**
**डॉ. शीतल गोर्डे-पाटील**

: मार्गदर्शक :

**श्री. सागर फडके**

**प्रकाशक :** सौ. रेखाताई नानासाहेब सूर्यवंशी, प्रतीक प्रकाशन, 'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर-४१३५१५.

**मुद्रक :** कल्पना मल्टीटेक, ४६१/४ सदाशिव पेठ, पुणे-३०.

**साहित्य व वर्गणी पाठविण्याचा पत्ता :** डॉ.नानासाहेब सूर्यवंशी, 'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर, जि.लातूर-४१३५१५, भ्रमणध्वनी : ९४२३६५५८४१, ई-मेल : suryawanshinanasaheb67@gmail.com

**अक्षर जुळणी :** शिवाजी ज्ञा. पांचाळ, लातूर, भ्रमणध्वनी : ९७६६२४०१२६, ई-मेल : shivajipanchal8@gmail.com

**स्वागत मूल्य :** रू.१,०००/-

*अक्षर वाङ्मयातील प्रकाशित मजकूराशी व लेखकांच्या मताशी प्रकाशक, संपादक आणि संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.*

| अ.क्र. | संशोधन पत्रिकेचा विषय | लेखकाचे नाव | पान क्र. |
|---|---|---|---|
| १८. | स्त्रीवादी साहित्य | डॉ.मनीषा आझाद नायकवडी | ८६ |
| १९. | 'अंधारवाटा' या महानगरीय कादंबरीतील स्त्रीवादाचे चित्रण | डॉ. शीला धम्मपाल रत्नाकर | ९२ |
| २०. | सानिया यांच्या कथासाहित्यातून उमटलेला स्त्रीवाद- एक दृष्टिक्षेप | सुवर्णा रामचंद्र शिंगाडे | ९८ |
| २१. | नाशिक जिल्ह्यातील लोकोत्सवातील स्त्रीधन | प्रा. पंकज पवार | १०६ |
| २२. | स्त्रीवादी साहित्य-समीक्षा | डॉ. सागर अशोक लटके | ११३ |
| २३. | मेघना पेठे यांच्या कथात्म साहित्यातील स्त्री जाणीवा | डॉ. राजश्री बंडोपंत पोवार | ११७ |
| २४. | स्त्रीवादी साहित्य : भूमिका आणि स्वरूप | जयश्री शिंदे-गायकवाड | १२२ |
| २५. | 'आयदान' : स्त्रीवादी आकलन | डॉ. शर्मिला बाळासाहेब घाटगे | १२९ |
| २६. | स्त्रीवादाचे स्वरुप आणि स्त्री सबलीकरणाची आजची स्थिती | डॉ. आनंद वारके | १३४ |
| २७. | मराठी कवितेतील स्त्रीवादी जाणीवा | डॉ. विजया प्रशांत पवार | १३९ |
| २८. | भारतीय लोकसाहित्यातून प्रकट होणारे 'स्त्री' जीवन | निवृत्ती मारोतराव टार्फे | १४७ |
| २९. | पौराणिक कादंबरीतून उमटलेला स्त्रीवाद | डॉ. सुवर्णा तानाजीराव जाधव | १५३ |
| ३०. | स्त्रीवादी संकल्पना आणि सिद्धांत | डॉ. प्रताप गायकवाड | १५९ |
| ३१. | कष्टकरी स्त्री जीवनाची कैफियत : डोंगरमाथा | सचिन माधवराव कोतकर | १६४ |
| ३२. | 'समाज, स्त्रीवाद आणि स्त्रीवादी साहित्य' | श्रीरंग अरविंद तराळ | १६८ |
| ३३. | 'आयदान' मधील स्त्रीवादी जाणिवा | भारती श्रीधर कोळेकर | १७७ |
| ३४. | ओवी : 'स्त्री' जीवनातील विविधांगी अनुभव दर्शन' | संजय चव्हाण | १८४ |
| ३५. | एकविसाव्या शतकातील जबाबदार स्त्रीचे स्थान | अजितकुमार भिमराव पाटील | १९० |

अक्षर वाङ्मय : ISSN : 2229-4929

# कष्टकरी स्त्री जीवनाची कैफियत : डोंगरमाथा

**सचिन माधवराव कोतकर**
सहायक प्राध्यापक, राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर

**प्रास्ताविक :**

भारतामध्ये आर्यांचे आगमन होण्यापूर्वी पासून आदिवासी समाज भारतीय भूमीत वास्तव्य करून आहे. प्राचीन काळापासून आदिवासी समाजाची संस्कृती चालत आलेली आहे. आपले अस्तित्व टिकवून ठेवण्या सोबतच आपली डोंगरदऱ्यातील संस्कृती जतन करण्याचा प्रयत्न आदिवासी समाज करताना दिसतो. भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक इतिहासात मात्र आदिवासी समाज दूर्लक्षीतच राहिलेला दिसतो. स्वातंत्र्यानंतर देखील हा समाज आपल्या न्याय,हक्कापासून वंचित असलेला दिसतो. आदिवासीएत्तर साहित्यीकांनी कुतूहलतेतून आदिवासी समाजाचे चित्रण साहित्यातून केलेले दिसते. नवशिक्षित आदिवासी तरूणांच्या हे लक्षात आले की, हे सर्व चित्रण वरवरचे आहे, एकांगी स्वरूपाचे आहे. मात्र साहित्यातून त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम केलेले दिसते. आदिवासी नवशिक्षित युवकांनी आपल्या लेखनीतून आदिवासी समाजाचे वास्तवदर्शी चित्रण केलेले दिसते.

कवयित्री सीता भोजने यांनी डोंगरमाथा या कविता संग्रहात कष्टकरी जीवनाची कैफीयत मांडत असताना त्यांनी स्त्रियांची दुःख मांडण्याचा प्रयत्न या कविता संग्रहात केल्याचे दिसून येते. त्यांची कविता स्त्रिशक्तीचे भान जागवताना दिसते. स्त्री ही फक्त आयुष्यभर अन्याय अत्याचार सहन करीत बसणारी नसून ती अन्याया विरूध्द आवाज उठविणारी वीरंगणा आहे हे त्यांनी आपल्या कवितेतून दाखविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

**आशावाद :**

कवयित्री सीता भोजने यांनी 'हेही दिवस' या कवितेमध्ये अहोरात्र काबाड कष्ट करणाऱ्या लोकांना आशेचा किरण दाखविण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला दिसतो.

"हेही दिवस जातील निघून, संघर्षाला विटलेले
तेही दिवस येतील परतून, समृध्दीने नटलेले
हेही दिवस जातील निघून, सावकारांनी वेढलेले
तेही दिवस येतील परतून, अर्थसाहाय्याने जोडलेले
हेही दिवस जातील निघून, दुबळवाडीने पिडलेले
तेही दिवस येतील परतून, स्वकर्तृत्वाने घडलेले"

कवयित्रीने जीवनाचा प्रचंड आशावाद वरील काव्यपंक्तीतून व्यक्त केलेला आहे. आदिवासी शेतमजूराला जीवन जगताना प्रचंड स्वरूपात कष्ट उपसावे लागतात. म्हणूनच कवयित्री याठिकाणी असे म्हणते की, संघर्षाचे हेही दिवस निघून जातील समृध्दीने नटलेले दिवस पुन्हा आयुष्यात येतील. शेतीसाठी अनेकदा सावकाराचे कर्ज

"माझी बहिणाई माऊली, मला शिकवले गाणं
माझ्या काव्यात मुरला, तिच्या गाण्यातच गुण
राबताना शेतामंदी, काया झिजली-झिजली
डोलणाऱ्या पिकामंदी,जशी बहिणाई हासली."

कवयित्री बहिणाईस आईची उपमा याठिकाणी दिलेली दिसते. कारण ती कवयित्रीला गाणं शिकविण्याचे काम केले आहे. त्यातूनच बहिणाबाईच्या काव्यात असलेले गुण तिच्या काव्यात उतरलेले दिसतात. आज बहिणाबाई जरी नजरेच्या आड गेलेली असली तरी तिच्या गाण्याचा वारसा मी जीवापाड जपलेला आहे असा विश्वास देखील ती कवितेतून व्यक्त करताना दिसते. प्रपंचामध्ये जरी गरीबी असली तरी मन मात्र समाधानी आहे. कारण जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेले बळ बहिणाईचं गाण देते याठिकाणी कवयित्रीने आपल्या माऊली विषयी कृतज्ञताच व्यक्त केलेली दिसून येते.

स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली करणारी 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले' यांच्या संबंधी कवयित्रीने 'सावित्रीबाईची कृपा' या कवितेतून कृतज्ञताच व्यक्त केली आहे.

"सावित्रीबाईची कृपा, दृष्टी न्यारी
स्त्री शिक्षणाने उध्दरली नारी
शिकून सवरून, नोकरीला गेली
क्षणात कमाल, कर्तृत्वाने केली
दोन्ही घरी होऊ लागला सन्मान
सावित्रीबाईला त्याचा बहुमान"

सावित्रीबाईच्या कृपा दृष्टीमुळेच स्त्रियांना सार्वत्रिक शिक्षणाचा अधिकार मिळाला. शिक्षणामुळेच समस्त स्त्री वर्गाचा उध्दार झाला असे कवयित्री याठिकाणी म्हणताना दिसते. ज्या स्त्रियांचे विश्व फक्त चूल आणि मूल एवढया पुरतेच मर्यादीत होते तिच स्त्री आज घराच्या बाहेर पडून नोकरी करू लागली आहे. ही कमाल सावित्रीबाईच्या कर्तृत्वामुळेच झाली असल्याचा सार्थ अभिमान कवयित्री या ठिकाणी व्यक्त करताना दिसते. आज शिक्षित झालेल्या स्त्रिला दोन्ही घरी मानसन्मान मिळू लागला आहे. हा बहुमान त्या सावित्रीबाईचा आहे. सावित्रीबाईच्या विचाराने आजची स्त्री कशा पध्दतीने प्रेरीत झाली आहे; हेच या कवितेतून कवयित्रीला सूचवायचे आहे.

आदिवासी कवयित्री सीता भोजने यांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून कष्टकरी स्त्री वर्गाचे चित्रण केले आहे. कष्टकरी माणसांचे दु:ख ठसठशीतपणे मांडण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला दिसतो. आजचे जीवन जरी दु:खात असले तरी येणारे दिवस हे निश्चितच आनंदाचे असतील असा सार्थ आशावादही त्या व्यक्त करताना दिसतात. स्त्रियांची सोशीकता मांडत असतानाच त्या स्त्री शक्तीचा गौरव करताना देखील दिसून येतात.

**संदर्भ :**

1. सौ.सीता चंद्रभान भोजने, डोंगरमाथा, कामगार सहकारी मुद्रणालय मर्या; संगमनेर